**२०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानास उपलब्ध झालेले अनुदान जलयुक्त शिवार अभियानातील मंजूर गावांना वितरीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
शासन निर्णय क्र. मफुअ-२०१५/प्र.क्र.३६/जल-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : २५ मे, २०१५.**

वाचा :

**शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:**

१) जलसं-२००२/प्र.क्र.५८१/जल-७, दिनांक २८ फेब्रुवारी, २००२.
२) जलसं-२००२/प्र.क्र.६७०/जल-७, दिनांक २९ नोव्हेंबर, २००२.
३) जलसं-१००३/प्र.क्र.७९/जल-८, दिनांक १८ जून, २००३.
४) जलसं-१००४/प्र.क्र.४७/जल-८, दिनांक २४ ऑगस्ट, २००४,
५) जलसं-१००४/प्र.क्र.४७/जल-८, दिनांक १४ सप्टेंबर, २००५.
६) जलसं-१००५/प्र.क्र.९५/जल-८, दिनांक २४ फेब्रुवारी, २००६.
७) जलसं-२००६/प्र.क्र.१३४/जल-८, दिनांक ५ एप्रिल, २००७.
८) जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक १८ सप्टेंबर, २००८.
९) जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक २० फेब्रुवारी, २००९.
१०) जलसं-२००९/प्र.क्र.३४/जल-८, दिनांक १ जुलै, २००९.
११) जलसं-२०१०/प्र.क्र.१३/जल-८ दिनांक १८ मार्च, २०१०.
१२) जलसं-२०११/प्र.क्र.१६/जल-८, दिनांक ३० मार्च, २०११.
१३) मफुअ २०१२/ प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक २८ मार्च, २०१२.
१४) मफुअ-२०१३ /प्र.क्र.६२ / जल-८ दिनांक ०५ एप्रिल, २०१३.
१५) मफुअ-२०१५ /प्र.क्र.५४ / जल-८ दिनांक ०१ एप्रिल, २०१५.
१६ ) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राकृवि ०४१५ / प्र.क्र.३१ / राकृवियो कक्ष दिनांक २२ मे २०१५

**<u>प्रस्तावना</u> :**

राज्यातील पर्जन्याधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, अत्यंत मौल्यवान असे पाणी व माती यांचे संवर्धन करणे, पडीक जमिनीचा विकास करणे, रोजगार उपलब्धतेत वाढ करणे आणि पर्यायाने कृषि उत्पादनात वाढ करुन मौल्यवान भूसंपत्तीमध्ये स्थायी स्वरुपाची सुधारणा करणे याकरीता महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान राज्यात दिनांक १ मे, २००२ पासून सुरु करण्यात आले. हे अभियान प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागाद्वारे राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून राबविलेल्या या अभियानाचे ठोस यश पाहता हे अभियान सन २००२-२००३ पासून सातत्याने पुढे राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. संदर्भाधीन दिनांक ०१ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये हे अभियान पुढील ०५ वर्षासाठी अर्थात सन २०१९-२० पर्यंत राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या अभियानास आजपर्यंत निधी अर्थसंकल्पीत होत नाही. तथापि सन २०११-१२ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी मिळण्यास सूरुवात झाली आणि ख-या अर्थाने या अभियानाचे भौतीक सदृष्य परिणाम दृष्टीपथात येवू लागले. सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून दिनांक २२ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये या अभियानास प्राप्त झालेले अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

कृषि व पदुम विभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून संदर्भाधीन क्र. १६ येथील दिनांक २२ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानास रु. ४०.०० कोटी अनुदान मंजुर करुन दिले आहे. हे मंजूर अनुदान जलयुक्त शिवार अभियानात निवडलेल्या ६००० गावांना वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे. हे मंजूर अनुदान पाझर तलाव सिमेंट नाला बंधारे/माती नाला बंधारे, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करणे, दुरुस्ती करणे,विहिर पुर्नभरण व गाळ काढणे, खोल सलग समतल चर याबाबीवर खर्च करण्यात यावा.

२. <u>**हा निधी खर्च करताना खालील सूचनांचे पालन करावे.**</u>

(१) जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढण्यात यावा. ज्या ठिकाणी लोकसहभाग मिळणार नाही अशा ठिकाणी शासकीय व खाजगी मशिनरीला ( जे सी बी व पोकलेन ) केवळ गाळ काढण्याच्या कामा करिता फक्त डिझेल वरील खर्चासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

(२) ज्या सिमेंट नाला बांध व माती नाला बांधाची, पाझर तलाव, गाव तलाव आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांची दुरुस्ती आवश्यक आहे आणि त्यात गाळ साचलेला आहे त्यातील प्रथम साचलेला गाळ प्राथम्याने लोकसहभागातून काढावा तद्नंतर दुरुस्ती वितरीत शासन निधीतून करावी.

(३) ज्या पाणलोटात दुरुस्तीसाठी जलस्त्रोत उपलब्ध नसल्यास अथवा ज्या ठिकाणी खोल सलग समतल चर साठी योग्य स्थळ उपलब्ध असेल तेथे प्राधान्याने खोल सलग समतल चर करावा.

३. हा निधी खर्च करण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत असून आयुक्त कृषि महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अधिनिस्त ठेवण्यात येत आहे. त्यांनी सदर निधीचे वाटप <u>**प्रपत्र अ**</u> मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व जिल्ह्यांना वितरीत करावा. जिल्हाधिकारी यांनी संबधीत जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानात निवडलेल्या गावांना प्राधान्याने निधी वितरित करावा आणि ज्या उद्दिष्टासाठी निधी वितरीत केलेला आहे त्याच उद्दिष्टासाठी खर्च होणार याची दक्षता घ्यावी.

४. हा निधी खर्च करण्यासाठी आयुक्त, कृषि यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा भौतीक व आर्थीक प्रगती अहवाल आणि खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र शासनास वेळेत सादर करावे.

५. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०५२५१४३९४४५९२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: CN = Shankar Trambak Jadhav, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2015.05.26 10:44:45 +05'30'

( शं. त्र्यं. जाधव )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा.विरोधी पक्षनेते विधान परिषद व विधानसभा यांचे सचिव,

४) मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
६) सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
७) कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
८) मुख्य सचिव यांचे सहसचिव,
९) सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
१०) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) सर्व जिल्हाधिकारी,
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१७) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१८) प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०) सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२१) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२२) सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
२३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२४) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२५) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२७) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२८) सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
२९) सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३०) सर्व मुख्य वनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३१) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
३२) महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३३) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३४) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३६) सर्व मंत्रालयीन विभाग,
३७) कृषि व पदुम विभाग (राकृवियो कक्ष), मंत्रालय, मुंबई
३८) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३९) सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग, (जलसंधारण उप विभाग),मंत्रालय
४०) जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई

## प्रपत्र अ

**सन २०१५-१६ मधिल राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधीन महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी अभियानासाठी उपलब्ध झालेले अनुदान जलयुक्त अभियानातील निवडलेल्या गावाना वितरीत करण्याबाबत**

शासन निर्णय क्र. मफुअ २०१५ / प्र.क्र. ३६ / जल ८ दिनांक २५ मे २०१५

| अ.क्र. | जिल्हा | निवडलेली गावे | रु. ६६६६५ प्रती गाव या प्रमाणे जिल्ह्यांना वितरित करावयाचा निधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रायगड | ४५ | २९९९९२५ |
| २ | रत्नागिरी | ४५ | २९९९९२५ |
| ३ | सिंधुदुर्ग | ३४ | २२६६६१० |
| ४ | ठाणे | २६ | १७३३२९० |
| ५ | पालघर | ५० | ३३३३२५० |
| **एकुण कोकण विभाग** | | **२००** | **१३३३३०००** |
| ६ | अहमदनगर | २७९ | १८५९९५३५ |
| ७ | धुळे | १२९ | ८५९९७८५ |
| ८ | जळगाव | २३२ | १५४६६२८० |
| ९ | नंदुरबार | ७२ | ४७९९८८० |
| १० | नाशिक | २२९ | १५२६६२८५ |
| **एकुण नाशिक विभाग** | | **९४१** | **६२७३१७६५** |
| ११ | कोल्हापूर | ६९ | ४५९९८८५ |
| १२ | सांगली | १४१ | ९३९९७६५ |
| १३ | सातारा | २१५ | १४३३२९७५ |
| १४ | पुणे | १९५ | १२९९९६७५ |
| १५ | सोलापूर | २८० | १८६६६२०० |
| **एकुण पुणे विभाग** | | **९००** | **५९९९८५००** |
| १६ | औरंगाबाद | २२८ | १५१९९६२० |
| १७ | बीड | २७१ | १८०७६२१५ |
| १८ | हिंगोली | १२४ | ८२६६४६० |
| १९ | जालना | २०९ | १३९३२९८५ |
| २० | लातूर | २०२ | १३४६६३३० |
| २१ | नांदेड | २६१ | १७३९९५६५ |
| २२ | उस्मानाबाद | २१७ | १४४६६३०५ |
| २३ | परभणी | १७० | ११३३३०५० |
| **एकुण औरंगाबाद विभाग** | | **१६८२** | **११२१४०५३०** |

| अ.क्र. | जिल्हा | निवडलेली गावे | रु. ६६६६५ प्रती गाव या प्रमाणे जिल्ह्यांना वितरित करावयाचा निधी |
|---|---|---|---|
| २४ | भंडारा | ८६ | ५७३३१९० |
| २५ | चंद्रपूर | २१८ | १४५३२९७० |
| २६ | गडचिरोली | १५२ | १०१३३०८० |
| २७ | गोंदीया | ९४ | ६२६६५१० |
| २८ | नागपूर | ३१३ | २०८६६१४५ |
| २९ | वर्धा | २१४ | १४२६६३१० |
| **एकुण नागपुर विभाग** | | **१०७७** | **७१७९८२०५** |
| ३० | अकोला | १८० | ११९९९७०० |
| ३१ | अमरावती | २४३ | १६१९९५९५ |
| ३२ | बुलढाणा | २५६ | १७०६६२४० |
| ३३ | वाशिम | १८५ | १२३३३०२५ |
| ३४ | यवतमाळ | ३३६ | २२३९९४४० |
| **एकुण अमरावती विभाग** | | **१२००** | **७९९९८०००** |
| **एकुण महाराष्ट्र** | | **६०००** | **४०००००००** |